# स्पंदन

२०१०-११



श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ,बिद्री (मौनीनगर)

संचलित

# दूधसाखर महाविद्यालय, बिद्री



'साहित्याची निर्मिती प्रक्रिया' या विषयावर मार्गदर्शन करताना
ग्रामीण साहित्यिक प्रा. डॉ.मोहन पाटील (जयसिंगपूर)



मराठी विभाग आणि कला मंडळ, आयोजित 'काव्यवाचन'
कार्यक्रमात कविता वाचताना कवी संजय खोचारे (मुरुक्टे)



सामाजिक न्याय व सांस्कृतिक परिवर्तन या विषयावर
मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. आर. एन. साळवे



INSPIRE - 2011 चे प्रास्ताविक करताना
प्रा. डॉ. एस. एन. कुलकर्णी



INSPIRE - 2011 मध्ये मार्गदर्शन करताना
शास्त्रज्ञ, कुलगुरु डॉ. जी. डी. यादव.



INSPIRE - 2011 मध्ये मार्गदर्शन करताना
शास्त्रज्ञ प्रा. आनंद घैसास



वार्षिक गुणगौरव व पारितोषिक वितरण कार्यक्रमात
बोलताना मा. अमृत नाटेकरसो व इतर मान्यवर



वार्षिक पारितोषिक वितरण करताना
मा. अमृत नाटेकारसो व इतर मान्यवर

स्पंदन

श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री (मौनीनगर)

संचलित

# दूधसाखर महाविद्यालय, बिद्री - (मौनीनगर)

ता. कागल, जि. कोल्हापूर.

# स्पंदन

वार्षिक अंक अठरावा

## सन २०१०-११

## संपादक मंडळ

प्रमुख संपादक

**प्राचार्य डॉ. आर. एल. राजगोळकर**

कार्यकारी संपादक

**प्रा. डॉ. संजय पाटील**

विभागीय संपादक

**प्रा. डॉ. संजय पाटील** मराठी विभाग

**प्रा. डॉ. सादिक देसाई** हिंदी विभाग

**प्रा. चिंतामणी जाधव** इंग्रजी विभाग

**प्रा. डॉ. मानसिंग टाकळे** शास्त्र विभाग

## स्थानिक व्यवस्थापन समिती

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | मा. आमदार कृष्णराव परशराम पाटील |
| उपाध्यक्ष | : | मा.आनंदराव यशवंतराव पाटील |
| सदस्य | : | मा. विजयसिंह कृष्णाजी मोरे |
| सदस्य | : | मा. नामदेवराव शंकरराव भोईटे |
| सदस्य | : | मा. वसंतराव बापूसो (तु) पाटील |
| मुख्य सचिव | : | मा. एस. एस. चौगले |
| सचिव | : | प्राचार्य डॉ. आर. एल. राजगोळकर |
| शिक्षक प्रतिनिधी | : | प्रा. डॉ. संजय दशरथ पाटील |
| शिक्षक प्रतिनिधी | : | प्रा. दिनकर केरबा शिंदे |
| शिक्षक प्रतिनिधी | : | प्रा. दिंगबर दत्तोबा कोमेजवार |
| शिक्षकेतर प्रतिनिधी | : | श्री. प्रल्हाद विश्वास पाटील |

रजि. नं. केपीआर/केजीएल/आरएसआर (सीआर) २२६६/९९ स्थापना : १५/१०/१९९९

**श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ सेवकांची सहकारी पतसंस्था**

बिद्री (मौनीनगर), ता. कागल, जि. कोल्हापूर

आकर्षक व्याज दर (द.सा.द.शे)

मुदत बंद ठेव :

| | |
|---|---|
| ४६ दिवस ते १२ महिने | ७% |
| १३ महिने ते २४ महिने | ८% |
| २५ महिने ते ६० महिने | ९% |
| रिकरिंग ठेव : | ९% |

**सभासद हित, तत्पर सेवा**

| | | |
|---|---|---|
| ठेव | : | ९९.४२ लाख |
| कर्जे | : | १३१.९९ लाख |
| फंडस् | : | ११.२१ लाख |
| गुंतवणूक | : | १४.७४ लाख |
| खेळते भांडवल | : | १५८.४० कोटी |

सभासद व बिगर सभासद यांचेकडून ठेवी स्विकारल्या जातील

# श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री (मौनीनगर)



## मा. के. पी. पाटीलसो

अध्यक्ष,
श्री दूधगंगा-वेदगंगा सह.साखर कारखाना लि.,बिद्री
श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री

## मा. ए. वाय. पाटीलसो

उपाध्यक्ष,
श्री दूधगंगा-वेदगंगा सह. साखर कारखाना लि.,बिद्री
श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री






## मा. डॉ. आर. एल. राजगोळकर

प्राचार्य,
दूधसाखर महाविद्यालय, बिद्री

# श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री (मौनीनगर)

## संस्था पदाधिकारी



**मा. आर. डी. देसाई**

कार्यकारी संचालक, बिद्री कारखाना व

मानद सचिव,श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री



**मा. श्री. एस. एस. चौगले**

मुख्य सचिव, बिद्री कारखाना व

श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री



मा. विजयसिंह कृ. मोरे



मा. नामदेवराव शं. भोईटे



मा. दत्तात्रय श्री. पाटील



मा. गणपती गुं. फराकटे



मा. वसंतराव बा.(तु.) पाटील



मा. प्रविणसिंह वि. पाटील

# श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री (मौनीनगर)


मा. दत्तात्रय तु. खराडे


मा. पंडितराव द. केणे


मा. केरबा गो. नांदेकर


मा. धनाजी रा. देसाई


मा. श्रीपती बा. पाटील


मा. जीवन पा. पाटील


मा. नेताजी कुं. पाटील


मा. सुनिल शि. कांबळे


मा. राजेखान का. जमादार


मा. विलास कों. झोरे


मा. सौ. सविता भि. एकल


मा. सौ. कमल धो. चौगले

# राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबीर

## सरवडे, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर.



सरवडे येथे वनराई बंधारा बांधताना स्वयंसेवक



गोचिड निर्मुलन औषध फवारणी करताना स्वयंसेवक



शिबिरामध्ये स्वच्छता करताना स्वयंसेवक



सरवडे येथे खुदाई करताना स्वयंसेवक



रक्तदान करताना स्वयंसेवक



महात्मा गांधीजींच्या प्रतिमेचे पुजन करताना प्रा.टी.जी.पवार





मालवे ता. राधानगरी येथे एकदिवसीय श्रमसंस्कार शिबीरात ग्रामसफाई करताना स्वयंसेवक

# आमचे गुणवंत



अमोल यशवंत भोई
बी.ए. I प्रथम



कु. शुभांगी दिलीप सावळे
बी.ए. II प्रथम



कु. शितल शंकर पाटील
बी.ए. III प्रथम



संदीप राजाराम भालेकर
बी.एस्सी. I प्रथम



कु. सीमा पांडुरंग पाटील
बी.एस्सी. II प्रथम



कु. पुनम भिकाजी गोते
बी.एस्सी. III प्रथम



कु. प्रिया विजय महादेवकर
बी.सी.एस. I प्रथम



जावेद रमजान मिरजकर
बी.सी.एस. II प्रथम

हिंदी स्कॉलरशिप



कु. अर्चना प्रताप पालकर
बी.ए.I



कु. आस्मा जमादार
बी.ए.II

# हार्दिक अभिनंदन



प्रा. डॉ. एस. एन. झेंडे
रसायनशास्त्र विषयात पीएच. डी.



प्रा. डॉ. संजय पाटील,
सदस्य, मराठी अभ्यास मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



प्रा. एन. डी. पाटील
मास्टर्स असो. कोल्हापूर मार्फत चंदीगड (पंजाब)
येथील राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

# श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री (मौनीनगर)



UPSC उत्तीर्ण डॉ. विशाल देसाई सत्कार व मार्गदर्शनपर व्याख्यान कार्यक्रम



अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत 'व्यक्तिमत्व विकास' या विषयाच्या एकदिवसीय कार्यशाळेचे उद्घाटक प्रा. पेठे सर



महाराष्ट्र विवेक वाहिनी, शाखेच्या उद्घाटनानिमित्त मंत्राने अग्नी पेटवताना प्रा. डॉ.ए.आर.माने व विवेक वाहिनीचे विद्यार्थी



मराठी भाषा दिनानिमित्त महाविद्यालयात मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. आनंद वारके मंचावर डॉ. संजय पाटील, प्रा.डी.के.शिंदे, प्रा.कु.सारिका कांबळे.



Interaction with P. S. Devdhar (Electronic Scientist)
1. Desai Dayanand J. & 2. Desai Sanjay R.



राज्यशास्त्र विभागामार्फत सावित्रीबाई फुले जयंती दिवशी दिपप्रज्वलन करताना प्राचार्य डॉ. राजगोळकर



बी. ए. व बी. एस्सी भाग ३ च्या विद्यार्थ्यांना सदिच्छा देताना मा. प्राचार्यसो.



ज्येष्ठ साहित्यिका गिरीजा किर यांच्याहस्ते 'महादेव मोरे यांचे साहित्य' या ग्रंथास मिळालेला पुरस्कार स्विकारताना प्रा. डॉ. संजय पाटील' विशेष ग्रंथ पुरस्कार' दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर

# संपादकीय....

'स्पंदन' चा हा अठरावा अंक आम्ही प्रसिध्द करीत आहोत.२०१० - २०११ या शैक्षणिक वर्षात आमच्या महाविद्यालयात विविध उपक्रम पार पडले. यामध्ये वार्षिक अंकात लेखन करणाऱ्या नवोदितांना मार्गदर्शन करण्यासाठी एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेत कथा, कविता, कादंबरी, ललित साहित्य कसे लिहावे याचे मार्गदर्शन केले. परिणाम असा झाला की यावर्षीच्या 'स्पंदन' साठी फार कमी लेखन आले. प्रतिसाद कमी असला तरी त्यामध्ये दर्जा आहे.

आमच्या मित्रांनी या वर्षी छत्रपती शिवाजी महाराज, ग्रामीण प्रश्न, स्त्रीभ्रुणहत्या, वैज्ञानिक आणि व्यक्तीचित्रणात्मक लेख लिहीले. आंतरराष्ट्रीय दर्जाचे वैज्ञानिक डॉ. जी. डी. यादव यांच्या मार्गदर्शनाने आमचे विद्यार्थी - विद्यार्थिनी खूपच भारावून गेले. त्यांच्यावर आमच्याकडे एकूण १५ लेख आले. त्यापैकी एका लेखाची निवड करून येथे संपादित केला आहे. 'साहित्यनिर्मिती प्रक्रिया' या एकदिवसीय कार्यशाळेत ग्रामीण साहित्यिक प्रा. मोहन पाटील, कवी गोविंद पाटील, प्रा. चंद्रशेखर कांबळे, श्री. मारूती मांगोरे यांनी आपल्या जीवनानुभवाबरोबर स्वतःच्या साहित्यनिर्मितीची बीजे विद्यार्थ्यासमोर उलगडून दाखविली. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांना भावले ते ते मांडण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे.

आमच्या महाविद्यालयाच्या प्रगतीचा ध्यास घेणारे मातृसंस्थेचे अध्यक्ष लोकप्रिय आमदार मा. के. पी.पाटील सो, उपाध्यक्ष मा. ए. वाय. पाटील सो, कार्यकारी संचालक आर. डी. देसाई साहेब, सचिव चौगले साहेब, सर्व संचालक आणि सभासद यांच्या सहकार्याने व मार्गदर्शनाने आम्ही आमची प्रगती करू शकलो हे नमूद करावे लागेल. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजगोळकर सर नेहमीच प्रोत्साहान देतात.

स्पंदनच्या निर्मितीसाठी संस्थेचे प्रोत्साहन, मा. प्राचार्यांचे मार्गदर्शन, संपादक मंडळ, सर्व प्राध्यापक, प्रशासकीय सहकारी, विद्यार्थी - विद्यार्थिनी, आणि श्रीपाद ऑफसेटचे मालक श्री. आर. डी. पाटील (देवाळेकर) व त्यांचे सर्व सहकारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या सर्वांचे मी मनःपूर्वक आभारी मानतो. धन्यवाद !

आपलाच

**प्रा. डॉ. संजय पाटील**

# माझे मनोगत....

दूधसाखर महाविद्यालय, बिद्री हे चार तालुक्यांच्या सीमेवर वसलेले, स्वतःची ओळख असलेले व दर्जेदार शिक्षण देणारे महाविद्यालय म्हणून परिसरामध्ये ओळखले जाते. महाविद्यालयाची आजची विद्यार्थी संख्या पाहता (११५०) महाविद्यालयाची इमारत नजिकच्या काळात अपूरी पडणार, असे वाटते एकंदरीत विद्यार्थीनींच्या दृष्टीने महाविद्यालयाकडे असलेल्या सुविधा पुरेशा असून त्याची कमतरता भविष्यात जाणवणार आहे. चार तालुक्यामध्ये महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या मुलांची संख्या प्रभावीपणे वाढलेली दिसून येते.

ग्रामीण भागातील विद्यार्थी आजच्या जागतिकीकरण. उदारीकरण व खाजगीकरणाच्या बदललेल्या परीस्थिती मध्ये स्पर्धेत टिकाव धरेल व भविष्याची वाटचाल विश्वासाने, ध्येयाने, व एक सक्षम नागरीक म्हणून करेल, असे वाटते, याच अनुषगाने महाविद्यालयामध्ये वेगवेगळ्या शैक्षणिक, सांस्कृतीक, क्रीडा विषयक उपक्रम आयोजित केले जातात. सदर धोरणास अनुसरून -

१) साहित्य निर्मिती या कार्यशाळामार्फत वेगवेगळ्या साहित्यकांशी चर्चा व मार्गदर्शन आयोजित करण्यात आले होते.

२) शारीरिक क्षमता वाढ या करीता सैन्य व सुरक्षा दलामध्ये भरतीसाठी. मार्गदर्शन व कार्यशाळा आयोजित केली.

३) व्यक्तीमत्व विकासासाठी योगा व संमोहन कार्यशाळेमध्ये मानसिक क्षमता वाढवणेसाठी मार्गदर्शन केले.

४) सैन्य भरती प्रक्रीया व्यवसाय मार्गदर्शन विभागामार्फत सैन्यातील तज्ञांनी मार्गदर्शन केले.

५) इन्स्पायर २०११ ही पाच दिवसाची कार्यशाळा भागातील हुशार व होतकरू विद्यार्थ्यांसाठी शास्त्र शाखेकडे संशोधन क्षेत्रात आकृष्ट करण्याकरीता डीपार्टमेंट ऑफ सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजीच्या आर्थिक सहाय्याने ११ वी व १२ वी मध्ये शिकत असलेल्या जवळ जवळ ३०० विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय स्तरावरील थोर शास्त्रज्ञांची व्याख्याने, चर्चा व मार्गदर्शन करण्यात आली होती.

वरील विविध कार्यक्रमांतर्गत आणि विद्यार्थ्यांसमोर आदर्श व्यक्तीचे चरीत्र उभे करणेसाठी चालू शैक्षणिक वर्षामध्ये जवळ जवळ २० ते २५ शास्त्रज्ञ, साहित्यिक, शिक्षक, सैन्य अधिकारी यांना निमंत्रण केले होते व त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ विद्यार्थ्यांना मिळवून दिला. वरील सर्व तज्ञ व्यक्तींच्या मार्गदर्शनानंतर विद्यार्थ्यांना सैन्य, पोलिसदल, पर्यावरण शास्त्रज्ञ, अणुशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ, मुख्याधिकारी होण्याकरीता प्रोत्साहीत झाल्याची भावना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसून आली.

महाविद्यालय विद्यार्थ्यांना, प्राध्यापकांना व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना वेगवेगळ्या उपक्रमामध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहीत करत असते. त्यांचाच भाग म्हणून 'अविष्कार' शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर. येथे शिबीरामध्ये ५ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. मराठी विज्ञान परिषदेच्या वार्षिक अधिवेशनामध्ये महाविद्यालयाच्या ५ विद्यार्थ्यांनी सलग दुसऱ्या वर्षी भाग घेतला व मिळालेल्या ज्ञानाचा प्रसार भागातील शाळांमध्ये जावून केला. शैक्षणिकदृष्ट्या महत्वाची गोष्ट म्हणजे कला व शास्त्र शाखेकडील प्रत्येकी १०० विद्यार्थ्यांनी एम.ए. व एम.एस्सी. करीता प्रवेश घेतला आहे आणि उच्च शिक्षणाकडे जाण्याचा मार्ग अवलंबला आहे.

कॉम्प्युटर सायन्स पदवी घेतलेली पहिली बॅच बाहेर पडली व जवळ जवळ ८०% विद्यार्थी पदव्युत्तर शिक्षणाकरीता पुढे गेले. बी.सी.एम. विभागाकडील पहिली बॅच चालू शैक्षणिक वर्षी बाहेर

पडेल. रसायनशास्त्र या विषयामध्ये विद्यापीठामध्ये दुसऱ्या क्रमांकावर येण्याचा मान कु. पुनम गोते हिने मिळवला आहे.

समाज सेवा व श्रम संस्कार या करीता एन. एस. एस. चे वार्षिक शिबीर सरवडे या गावी पार पडले. विद्यार्थ्यांनी ग्रामपंचायतीच्या मदतीने समाजोपयोगी सेवा केल्या. त्याच बरोबर समाज प्रबोधनही घडवून आणले. बौध्दिक क्षमते बरोबर शारीरिक क्षमताही खूप महत्वाची असल्यामुळे विविध क्रीडा स्पर्धेमध्ये भाग घेण्यास प्रोत्साहीत केले जाते विविध क्रीडा प्रकारामध्ये विद्यार्थी विद्यापीठ व अंतर विद्यापीठ स्तरावर चमकले आहेत. पोहणे, जिमनॅस्टीक हॉलीबॉल, ॲथलॅस्टीक इ. स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांबरोबर प्राद्यापकानींही यश मिळविले आहे.

महाविद्यालयामधील कायमस्वरूपी २५% प्राध्यापकांनी पीएच. डी. ही पदवी प्राप्त केली आहे. जवळ जवळ ११ प्राध्यापक पीएच. डी. पदवी प्राप्त करण्याच्या मार्गावर आहेत. अनेक प्राध्यापंकांनी आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य व विद्यापीठ स्तरावर संशोधनपर लेख सादर करून ज्ञान वाढविण्याच्या प्रक्रियेमध्ये भाग घेतला आहे. तसेच विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक क्रीडा विषयक, सांस्कृतीक उपक्रमामध्ये मोलाचे सहकार्य दिलेले आहे. राज्यस्पर्धा परीक्षा व विद्यापीठ परीक्षा प्रक्रियेमध्ये अनेक प्राध्यापक सहभागी असून आपला कार्याचा वाटा उचलत आहेत.

वरील सर्व गोष्टीवरून असे दिसून येते की, महाविद्यालयाची यशस्वी वाटचाल चाललेली आहे. यामध्ये विद्यापीठ अनुदान आयोग, राज्यसरकार व केंद्रसरकार यांचा आर्थिक अनुदानाचा वाटा मोठा आहे महाविद्यालय भागातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक गरज पूर्ण करण्यास सक्षम आहे. महाविद्यालयाच्या यशामध्ये संस्थेचे अध्यक्ष मा. के. पी. पाटीलसो व उपाध्यक्ष मा. श्री. ए. वाय. पाटील तसेच सर्व संचालक मंडळ, सचिव, कार्यकारी संचालक, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी या सर्वांचा महाविद्यालयाच्या यशात मोठा वाटा आहे.

जय हिंद

**डॉ. आर. एल. राजगोळकर**

प्राचार्य,

## दूधसाखर महाविद्यालय, बिद्री

# ध्येय आणि उद्दिष्टे

**ध्येय**

जागतिक स्पर्धात्मक वातावरणाशी मुकाबला करण्यास ग्रामीण तरूण पिढीला सक्षम बनविण्यासाठी उच्च शिक्षणाचे व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून देणे.

**उद्दिष्टे**

१. ग्रामीण तरूण पिढीला शारीरिक' बौध्दीक आणि सांस्कृतीकदृष्टया सक्षम बनविणे.
२. उच्च शिक्षणाच्या माध्यमातून उच्च जीवनस्तराची आणि जीवनमानाची ग्वाही देणे.
३. उत्कृष्टतेच्या पाठपुराव्यासाठी शैक्षणिक आणि सामाजिक प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे कॉलेज परिसर आणि समाजामध्ये आयोजन करणे.
४. गतिमान जागतिकीकरण आणि विकासाच्या प्रभावशाली वातावरणामध्ये विद्यार्थ्यांच्या अंगी नैतीक मुल्यांची जपणूक करणे.

## Mission and Goals

*Mission*

*To Provide the broad platform of higher education to rural youth so as to cope up with the globally competitive environment.*

*Goals*

1. *To make the rural youth competent physically, intellectually and culturally.*
2. *To assure the stakeholders better living standards through the means of higher education.*
3. *For the quest of excellence, to arrange educational and outreach programs in campus and in society as well.*
4. *To inculcate moral values among the students in the dynamic environment of globalization and development.*

" लाभले अम्हास भाग्य बोलतो मराठी

जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी

धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी

एवढ्या जगात माय मानतो मराठी "

सुरेश भट

# मराठी विभाग

डॉ. संजय पाटील

# अनुक्रमणिका

## गद्य विभाग (लेख)


| | | पृ. क्र. |
|---|---|---|
| १) महान मुत्सद्दी छत्रपती शिवाजी महाराज | अर्जुन खतकर, बी. एस्सी. III | ३ |
| २) ग्रामीण विकास भारतीय विकासाचा कणा | कु. पद्मश्री तिबिले बी. एस्सी. I | ५ |
| ३) बाप - एक चिंतन | कु. वर्षाराणी काशिद - बी. ए. I | ७ |
| ४) मुलीच्या जन्मासाठी | कु. सविता पाटील - बी. ए. II | ८ |
| ५) का बुडाले टायटॅनिक (वैज्ञानिक लेख) | कु. ऋतुजा पाटील - बी. एस्सी. I | ९ |
| ६) मला समजलेले यादव सर (व्यक्तीचित्रणपर लेख) | कु. विद्या पाटील बी. एस्सी. I | ११ |


## पद्य विभाग (कविता)


| | | |
|---|---|---|
| १) राजे | कु. स्वाती चव्हाण बी. ए. II | १५ |
| २) राजा शिवछत्रपती | अजित बचाटे - बी.एस्सी. III (रसायनशास्त्र) | १५ |
| ३) हिमंत तू हरू नकोस | कु. सुनिता भोसले - बी. ए. III (मराठी) | १६ |
| ४) का ? कुणास ठाऊक ? | स्वप्निल यादव, बी. एस्सी. II | १६ |
| ५) व्यसनाधंता | हर्षल जितकर - बी. ए. II | १७ |
| ६) माय बाप | दिगंबर केरबा पाटील - बी. ए. I | १७ |
| ७) खूप शिकव तू मजला | कु श्रीकांता पाटील, बी. एस्सी. II | १८ |
| ८) आई | संदिप चौगले, - बी. एस्सी. III (रसायनशास्त्र) | १८ |
| ९) ये आय | कु. सुप्रिया कांबळे - बी.एस्सी. II | १८ |
| १०) आई | सुखदेव पाटील - बी. ए. II | १८ |
| ११) आयुष्य हे असंच असतं | कु- ज्योती मुगडे, बी. एस्सी. II (संगणक) | १९ |
| १२) जीवन | कु. अश्विनी मगदूम बी. ए. II | १९ |
| १३) कोण म्हणतो मागे पाय? | कु. पुनम कुरडे - बी. एस्सी.I | १९ |
| १४) लव्हलेटर लव्हलेटर.... | प्रसाद पाटील-बी. सी. एस. II | २० |
| १५) आभास | मारूती पाटील - बी. ए. I | २० |
| १६) कॉलेजकुमार | रावसाहेब पानारी - बी. ए. III (इंग्रजी) | २० |
| १७) सोबत | कु. माधुरी परीट - बी. ए. II | २१ |
| १८) कुलूप | कु. वर्षा युवराज पाटील बी. ए. II | २१ |
| १९) मैत्री | कु- अश्विनी खामकर बी. ए. III (इंग्रजी) | २१ |
| २०) जीवन | संदिप पाटील - बी. ए. III (मराठी) | २१ |
| २१) आयुष्य | कु. विजया यादव बी. ए. II | २२ |
| २२) सुखी संसाराचे रहस्य | ऋषीकेश चौगले बी. ए. III (इतिहास) | २२ |
| २३) मृगजळ | अजित पोर्लेकर बी. एस्सी. II | २३ |
| २४) मैत्रीण | जितेंद्र पाटील - बी. ए. III | २३ |
| २५) शितल चांदणी | अमित बी. ए. II | २४ |
| २६) खंत | अनिकेत बकरे बी.एस्सी. III | २४ |
| २७) अमर प्रेम | संदिप भालेकर बी. एस्सी. II | २४ |
| २८) कोण होती ती? | रोहीत पाटील बी. एस्सी. II | २५ |
| २९) तुच तू | उमेश कुंभार - बी. एस्सी. II | २५ |


## इतर


| | | |
|---|---|---|
| १) विचारधन (संकलन) | तेजस्वी चौगले - बी. ए. II | २६ |
| २) विचारधन (संकलन) | प्रकाश महाडेश्वर बी. ए. III (समाजशास्त्र) | २६ |
| ३) विचारधन (संकलन) | कु. तेजस्विनी पाटील बी. ए. II | २७ |
| ४) जीवनाचा चहा | कु. सविता सुर्यवंशी - बी. ए. II | २८ |
| ५) मुक्ताफळे | राहुल कांबळे - बी. एस्सी. I | २९ |
| ६) जीवन जगण्याची कला | वृषभ आमते बी. ए. II | २९ |
| ७) चारोळ्या | दिगंबर विष्णू पाटील बी.ए. I | ३० |
| ८) कॉलेजच्या आवारातील व्याख्या मजेदार लॉंग फॉर्म | कु. संजिवनी चव्हाण बी. ए. III (इंग्रजी) | ३१ |

## गद्य विभाग

# महान मुत्सद्दी छत्रपती शिवाजी महाराज.

स्वभाषा, स्वदेशा, स्वधर्मास्तवे जे !
स्वभाग्ये, जिथे जन्मलो मानिती जे
असा जन्म हेतु जयांच्या अुरात
अशांची ' शिवाजी ' असे जन्म जात ।।

अफझलखानाचा वध, शाहिस्तेखानाची बोटे छाटणे किंवा आग्राहून सुटका या छत्रपतींच्या जीवनातील महत्वाच्या घटना निश्चितच आहेत, परंतू या घटना म्हणजेच महाराजांचा इतिहास, असे नव्हे. महाराजांचे विविध क्षेत्रांतील कार्ये विश्वासाठी प्रेरणादायी व वंदनीय आहेत.

शिवरायांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करून स्वकर्तृत्वाने आपले राज्य निर्माण केले. त्यांची हिंदू धर्मावर प्रचंड श्रध्दा होती. पण ती आंधळी नव्हती: ते धर्माभिमानी होते. पण धर्म वेडे नव्हते. महाराज खऱ्या अर्थाने धर्मसुधारक होते. माणसाला विषमता शिकविणाऱ्या धार्मिक रूढी, परंपरांचा त्यांनी धिक्कार केला. त्यांची लढाई जात, धर्म, सर्वांना समान दर्जा, न्याय, स्वातंत्र्य व लोककल्याण लोकशाहीच्या स्थापनेसाठी होती.

शिवछत्रपती हे शेतकरी, कष्टकरी, बलुतेदार व श्रमावर जगणाऱ्या प्रजेचे राजे होते. त्यांनी कृषी क्षेत्राची विकासाची काळजी घेतली. रयतेच्या भाजीच्या देठालाही हात लावू नका, असा आदेश त्यांनी सैनिकांना दिला होता. महाराजांनी अन्याय, वतनदारी पध्दत बंद केली. युध्दात धारार्तिथी अथवा अपंग झालेल्या सैनिकांना मेहनताना देण्याची पध्दत त्यांनी सुरू केली. पर्यावरणाचे महत्व जाणून वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनास प्रोत्साहान दिले.

आगामी काळात भेडसावणाऱ्या समस्यांची महाराजांना जाण होती. मराठी राज्य व्यवहारकोश तयार करण्यास त्यांनी प्राधान्य दिले. त्या काळी अस्पृशांना वस्त्र धारण करण्यास बंदी होती. लष्करातील जातिभेद व अस्पृश्यतेला राजांनी जाणीवपूर्वक मूठमाती दिली. महाराजांच्या आरमारातील बहुतेक सैन्य कोळी, भंडारी, धनगर, रामोशी, बेडर, न्हावी, महार इत्यादी कनिष्ठ जातीचे होते. महाराजांनी नेहमीच समतेला प्राधान्य दिले. त्याकाळी धर्मानुसार सागरपर्यटनाला मनाई होती. पण राजांनी सिंधुबंदीची ती परंपरा मोडून आरमाराची उभारणी केली.

शिवरायांनी त्या काळच्या प्रस्थापित डच, फ्रेंच, पोर्तुगाल, ब्रिटीश या परक्या जुलमी सत्ता विरोधात संघर्ष केला. तसाच संघर्ष आदिलशाही, निजामशाही व मोगलशाही यांच्या विरोधी देखील केला. महाराजांचे वैरी दुष्ट व अन्यायी मुस्लीम प्रशासकांशी होते; मुस्लीम प्रजेशी नव्हे. शिवरायांना मुस्लीम शासकांचे जुलमी राज्य संपवायचे होते. छत्रपती शिवरायांच्या जीवनसंघर्षात मुस्लीम समजाचा सहभाग अतिशय महत्वाचा ; पण दुर्लक्षित विषय आहे. शिवरायांच्या पदरी अनेक मुस्लीम सरदार, वतनदार व इतर चाकर मोठमोठया हुद्यावर व जबाबदारीच्या पदावर प्रामाणिकपणे सेवा करीत होते. महाराजांचा लौकिक ऐकून प्रभावित होऊन अनेक मुस्लीम व पठाण सरदार त्यांच्या सैन्यात स्वतःहून दाखल झाले होते. महाराजांच्या हातून विश्वकल्याण साधले जावे म्हणून अनेक मुसलमानांनी आपले रक्त सांडले आहे.

माणसाची पारख करताना जात, धर्म, पंथ अशा संकुचित निकषांचा छत्रपतींनी कधीच विचार केला नाही. धर्मनिरपक्षतेच्या तत्त्वांचा अंगीकार जगभरातील अनेक राज्यकर्त्यांना आजही करता आलेला नाही असे चित्र दिसते; मात्र शिवाजी महाराजांनी त्या काळातही धर्मनिरपेक्षतेचे मुल्य आपल्या कारभारात जपले, ही स्तिमित करणारी गोष्ट आहे.

आज शिवरायांना आपण विश्ववंद्य वगैरे म्हणतो, पण महाराष्ट्राच्या बाहेर शिवराय फारसे माहीत नाहीत ही खेदाची गोष्ट आहे. महाराष्ट्रात जातीय अस्मितेपोटी फक्त मराठा जातीच्या कोंदणातच महाराजांना बंदिस्त करून आम्ही फक्त... की जयच्या घोषणा देतो. ब्रिटिशांच्या काळात शैक्षणिक पुस्तकात शिवरायांचा समावेश होता. स्वांतत्र्योत्तर काळात भाषावार प्रांतरचनेमुळे शिवराय मराठी भाषकांपुरतेच झाले हे दुर्दैव आहे. बंगाल प्रांतात शिवजयंतोत्सव होत असे. आज मध्य प्रदेशापासून वरच्या भागात व खाली दक्षिणेकडे ' शिवराय ' माहीती नाहीत. विश्ववंद्य ठरू शकणारा हा युगपुरूष संपुर्ण देशाला सुध्दा माहिती नाही याला काय म्हणावे ?

ज्या ध्येयानी हया हिंदुस्वातत्र्यांच्या युध्दातील नेत्यांमध्ये आणि सेनापतींमध्ये जितकी दृढ निष्ठा उत्पन्न केली आणि त्यांच्यात इतका आवेश आणला ते ध्येय म्हणजे हिंदूपदपादशाही - स्वतंत्र हिंदुसाम्राज्याची प्रस्थापना करणे हे होते. आणि ज्या युध्दपध्दतीने मुसलमानी इंग्रज, डच सत्तेला मराठ्यांच्यापुढे तग धरणे अशक्य केले आणि अंती जिने हिंदुशिर्षावर विजयकिरीट चढविला ती युध्दपध्दती म्हणजे शत्रुला चकवायची - ' गनिमी कावा ' युध्दपध्दती होती. बलाढय अशा अमेरिकेला जेव्हा महाराष्ट्रापेक्षा लहान अशा ' क्युबा ' या देशाने हरविले त्याचे सर्वश्रेय जाते त्यावेळीचे क्युबाचे राष्ट्राध्यक्ष फ्रिडेल क्रास्टो यांना जगातील सर्व देश याने अचंबीत झाले होते. जगातील मिडीयाने त्यावेळी त्यांची मुलाखत घेतली तेव्हा मिडीयाने त्यांना प्रश्न विचारला कि, तुम्ही बलाढय अशा अमेरिकेला कसे हरविले त्यावेळी ते म्हणाले कि भारत देशामध्ये शिवाजी राजा होऊन गेला त्यांच्या 'गनिमी कावा ' या युध्दतंत्राचा वापर करून आमच्या देशाने अमेरिकेला हरविले. याच फ्रिडेल क्रास्टोने आपल्या स्मारकावर एक वाक्य लिहायला सांगितले होते की ' येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा मावळा चिरनिद्रा घेत आहे.' शिवछत्रपतींच्या युध्दनितीचा वापर परदेशात केला जातो पण ज्या देशात शिवछत्रपती घडले त्या देशाला त्यांचे विस्मरण होत आहे.

शिवरायांचे नाव घेऊन समाज आज आपापसात लढत आहेत. जातीयतेच्या व धर्मांधतेच्या विषारी प्रचाराने माणसांचे मरण स्वस्त झाले आहे. या पार्श्वभुमीवर देशाची एकता व अखंडता अबाधित राहावी, यासाठी शिवछत्रपती सारख्या महापुरूषांच्या विचारांपासून प्रेरणा घेणे हे आपले कर्तव्य आहे. त्यासाठी महाराजांचा खरा इतिहास व दृष्टीकोन जाणून घेण्याची जबाबदारी आपणा सर्वांची आहे.

अर्जुन शिवाजी खतकर
B. SC. III (Chemistry)

# ग्रामीण विकास
# भारतीय विकासाचा कणा

'भारत' अतुल्य आणि अविस्मरणीय ! भारत हे केवळ एक राष्ट्र नसून तेथे अनेक भाषा - वेशभुषा रंग - रूप असणारे लोक गुण्या - गोविंदाने राहत आहेत. याचा येथील प्रत्येक भारतीयाला सार्थ अभिमान वाटतो. म्हणूनच येथील प्रत्येक जण प्रतिज्ञा करतोय

'' भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत. माझ्या देशावर माझे प्रेम आहे....''

जसे येथे राहणीमानात भिन्नता आढळते, त्याचप्रमाणे भारत प्राकृतिक विविधतेने संपुर्ण नटलेला आहे. गंगा - यमुना - ब्रम्हपुत्रा या तीन नद्याच्या संगमामुळे भारत खऱ्या अर्थाने सुजलाम - सुफलाम झाला आहे. पुर्व - पश्चिम - दक्षिण या तिन्ही दिशांना हात - पसरून स्वागत करणारा अरबी समुद्र आणि हिंदी महासागर बघितला की, त्यांच्या विशालतेची आणि अथांगतेची आपणांस कल्पना येते. उत्तरेला खडा उभा असणारा ' हिमालय 'तर भारताच्या शिरपेचातील एक शिरोमणी शोभून दिसतो आहे.

असा हा विविधतेने नटलेला 'भारत' आज जागतिक प्रगतीच्या मार्गावर अखंडपणे मार्गक्रमण करत आहे. या प्रगतीचा अविभाज्य घटक असणारा ग्रामीण भाग आणि त्याचे या प्रगतीतील स्थान मांडण्याचा प्रयत्न डॉ. जी. डी. यादव सर केमिकल इन्स्टिटुटयूट ॲन्ड टेक्नॉलॉजी मुंबईचे कुलगुरू यांच्या प्रेरणेतून मी करत आहे.

गेल्याच आठवडयात आपण भारताचा ६२ वा. 'प्रजासत्ताक दिन' मोठया उत्साहात साजरा केला. ब्रिटीश कालीन राजवटीपासून ते आता पर्यंतचा भारताचा इतिहास बघितला, तर कदाचित कल्पना येते भारत भूमिला इंग्रजांच्या विळख्यातून बाहेर काढण्यासाठी किती हुतात्म्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली आहे. जणू आपल्या कृतीतून ते भारत मातेला सांगत आहेत.

'' कशास आई भिजवीसी डोळे उजळ तुझे भाल / रात्रीच्या गर्भात उदयाचा असे उषःकाल....''
महात्मा. गांधीपासून ते राहुल गांधीपर्यंतच्या पिढीपर्यंत भारताने केलेली प्रगती खरचं वाखाणण्याजोगी आहे. भारताने प्रत्येक क्षेत्रात आपला छाप उठवण्यास सुरूवात तर केव्हाच केली आहे. आता या प्रगतीच्या एक्सप्रेस ला ब्रेक लावणे केवळ अशक्यच....!!!

भारत हा जसा कृषीप्रधान देश आहे. त्याचप्रमाणे तो खेडयात वसलेला देश आहे. महात्मा गांधीनीच संदेश दिला आहे - ' खेडयाकडे चला ' भारताचा जर सर्वांगीण विकास व्हायचा असेल तर खरच खेडयाचा प्रथम विकास झाला पाहिजे. खेडयात 'शेती' हा प्रमुख व्यवसाय मानला जातो. पण आता शेतीबरोबरच इतर विकासाच्या वाटा ही पादाक्रांत करत आहेत हे तरूण... आणि खेडयांचा विकास म्हणजेच भारताचा विकास हे सुत्र लक्षात ठेवले पाहिजे, कारण भारतातील सुमारे ७२% लोक ग्रामीण भागात राहतात.

पुर्वी खेडयात बारा - बलुतेदार हे समाजव्यवस्थेचा अविभाज्य भाग होते. त्यानंतर चलन पध्दती अस्तित्वात आली. त्यानंतर व्यावहारीक ज्ञानाबरोबरचं पुस्तकी ज्ञानाचाही समावेश झाला. आता जगाच्या ' नेटवर्किंग ' या संकल्पनेत खेडयांचाही सहभाग वाढलाय. आता प्रत्येक ग्रामपंचायत आणि शिक्षण संस्था ई-लर्निंग (e - learning) या संकल्पनेत समाविष्ट झाली आहे. शिक्षण संस्थाही आता विकसीत संकल्पनांचा

स्विकार करत आहेत. त्यामुळेच खेडयातूनही अनेक तत्रंज्ञ आणि कुशल विद्यार्थी आपल्या सोबत ज्ञानाची शिदोरी घेऊन बाहेर पडत आहेत.

भारताने विज्ञान - तत्रंज्ञान क्षेत्रात केलेली प्रगती तर आश्चर्यकारक आहे. 'भारताच्या चांद्रयान -१' या मोहिमेने तर अनेक विकसीत देशांना तोडांत बोटे घालायला लावली आहेत. त्यामध्ये सहभागी असणाऱ्या शास्त्रज्ञांनी ज्ञान - अनुभव - जिद्द अशा त्रिसुत्रीने हे यशाचे शिखर गाठले आहे. याचं ज्वलंत उदाहरणचं बघा ना....

कोल्हापूरच्या ' उदय घाटगे ' या युवा शास्त्रज्ञाने तयार केलेल्या ' सॅटेलाईट बुम ' या उपकरणाला 'भारतीय अवकाश संशोधन केंद्र (ISTRO) ' या संस्थेने पेटंट मिळवून दिलयं. पुर्वी उपग्रहासाठी लागणारे हे उपकरण आपणास कॅनडा, ब्राझील आणि अमेरिका या प्रगत देशांकडून भरपूर पैसे देऊन विकत घ्यावे लागे. मात्र आता , त्याहीपेक्षा 'Advance Technology' असणार हे तंत्र कोल्हापूर वा आस-पासच्या खेडयातील तरूण पुढे येत आहेत.... आता मात्र खात्री वाटतेय की, डॉ. अब्दुल कलामांचं (माजी राष्ट्रपती) Vision 2020 हे स्वप्न साकार होईल नाही होणारच....

डॉ. कलामांनी पाहिलय एक स्वप्न... विकसनशील भारताला विकसीत भारत बनवायचं... आणि यासाठी त्यांना हवय पाठबळ या तरूण वर्गाच... अर्थातच या 'यंगीस्तानचं...' कारण त्यांना माहित आहे... Youths are the Strong pillors of our nation... या 'यंगीस्तानला' आता फक्त गरज आहे ती tve attitude ची... So always remember that....

''हम होंगे कामयाब.... हम होंगे कामयाब.... एक दिन
हो मन मे विश्वास
पुरा है विश्वास हम होंगे कामयाब.... एक दिन.... !! ''

कु. पदम्श्री दत्तात्रय तिबीले
B. Sc. - I

# ' बाप ' एक चिंतन

"शेतामंधी माझी खोप तीला बोराटीची झाप
तिथ राबतो कष्टतो माझा शेतकरी **बाप.**"

असे म्हणणाऱ्या इंद्रजित भालेराव यांनी या कवितेत बापाचा मोठेपणा दर्शवला आहे.

आई घराचं मांगल्य असते, तरी बाप घराच अस्तित्व असतं. पण घराच्या या अस्तित्वाला खरचं कधी आम्ही समजून घेतलेल आहे का? वडीलांना महत्व असूनही त्यांच्याविषयी जास्त बोललं जात नाही, लिहील जात नाही. कोणताही व्याख्याता आई विषयी जास्त वेळ बोलत राहतो. संत महात्म्यांनी आईचेच तोंड भरून कौतुक केले आहे. चांगल्या गोष्टींना आईचीच उपमा दिली जाते, पण बापाच्या विषयी कुठेच फारसे बोलले जात नाही. काही लोकांनी बाप रेखाटला तोही तापट, व्यसनी, मारझोड करणारा. समाजात एक दोन टक्के बाप असे असतातही, पण चांगल्या वडीलांबद्दल काय?

आईकडे अश्रुंचे पाट असतात पण बापाकडे सयंमाचे घाट असतात, आई रडून मोकळी होते पण समजावे वडिलांनाच लागते आणि रडणाऱ्यापेक्षा सांत्वन करणाऱ्यालाच जास्त ताण पडतो. कारण ज्योतीपेक्षा समईच जास्त तापतेना! पण श्रेय नेहमी ज्योतीलाच मिळत राहते. रोजच्या जेवणाची सोय करणारी आई आमच्या लक्षात राहते पण आयुष्याच्या शिदोरीची सोय करणारा बाप आम्ही किती सहज विसरून जातो. आई रडते वडिलांना रडता येत नाही, कारण छोट्या भावांना जपायचे असते, आई गेली तरी रडता येत नाही कारण बहिणीचा आधार व्हायच असतं, पत्नी अर्ध्यावरच सोडून गेली तर पोरांसाठी अश्रुंना आवर घालावा लागतो.

जिजाबाईंनी शिवाजी घडवला अस अवश्य म्हणावं पण त्यावेळेस शहाजी राजाची ओढाताणही लक्षात घ्यावी. देवकीचे, यशोदेचे कौतुक करावं पण पुरातून पोराला डोक्यावर घेऊन जाणारा वसुदेव लक्षात ठेवावा. राम हा कौशल्येचा पुत्र अवश्य असेल पण वियोगाने तडफडून मरण पावला तो पिता दशरथच होता. वडिलांच्या टाचा झिजलेल्या चपलाकडे पाहिले की प्रेम कळतं, त्यांची फाटकी बनियान पाहिली की कळतं आमच्या नशिबाची भोके त्यांच्या बनियानला पडली आहेत. त्यांची दाढी वाढलेला चेहरा त्यांची काटकसर दाखवतो.

मुलीला मॅक्सी घेतील मुलाला शर्ट घेतील पण स्वतः मात्र जुनी पॅन्ट वापरतील, मुलगा सलूनमध्ये २० – २५ रूपये खर्च करतो तर मुलगी ब्युटी पार्लरमध्ये तीसभर रूपये खर्च करते पण त्याच घरातला बाप दाढीचा साबण संपला म्हणून अंघोळीच्या साबणाने दाढी खरडत असतो. अनेकदा तो फक्त पाणी लावून दाढी करतो. बाप आजारी पडला तरी पटकन दवाखान्यात जात नाही. तो आजाराला मुळीच घाबरत नाही पण डॉक्टर एखादा महिना आराम करायला लावतील याची त्याला भिती वाटते, कारण पोरीचे लग्न, पोराचे शिक्षण बाकी असतं. घरात उत्पन्नाच इतर साधन नसतं ऐपत नसते तरीही मुलाला मेडिकल, इंजिनीअरींगला प्रवेश मिळवून दिला जातो. ओढाताण करून त्या मुलाला दर महिन्याला पैसे पाठविले जातात.

घरच्यांसाठी स्वतःच्या व्यथा दडपणारा बाप.... खरच किती ग्रेट असतो ना.....?

कु. वर्षाराणी सर्जेराव काशिद, B. A. - I

# " मुलीच्या जन्मासाठी "

जिल्हा परिषदेतर्फे १५ ऑगस्ट २००९ पासून आपल्या जिल्हयात 'लेक वाचवा' अभियान राबवले जात आहे. पण त्यामागचा नेमका हेतू काय? भविष्यात आपल्या मुलाला पत्नी मिळणार नाही म्हणून की, 'राष्ट्रीय मुल्य' असलेल्या 'स्त्री - पुरूष समानता' या तत्वाचे संरक्षण करण्यासाठी....

मुख्य म्हणजे 'सेव्ह द बेबी गर्ल' ही एक सामाजिक चळवळ आहे. मुलींची संख्या कमी करणं ही अनैसर्गिक प्रकृती आहे. मुलगाच वंशाचा दिवा, ही खोटी संकल्पना मानवी मनात किती खोलवर रूजली आहे याचा अनुभव पावला - पावलावर येत आहे. गर्भात मुलगा आहे कि मुलगी याची तपासणी करून त्या मुलीला जन्माला येण्याअगोदरच परत त्याच देवापाशी पाठवायचे, ज्याने तिला जन्माला घालण्याची भूमिका स्विकारली आहे. पण ते माणूसकीला कलंक लागल्यासारखे आहे हे देखील आपल्या धर्मा - अधर्माचा कांगावा करणाऱ्यांना समजू नये हीच का आपली महान भारतीय संस्कृती? मानवाने प्रत्येक गोष्टीत प्रगती केली आहे. अशक्यप्राय गोष्टी शक्य करून दाखवल्या आहेत. तशीच प्रगती करून नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून आपली उन्नती केली आहे. पण त्याचबरोबर सोनोग्राफी सारखे तंत्रज्ञान मात्र मानवी जीवनात लहान - लहान स्त्री भ्रुणांचा कर्दनकाळ बनत आहे.

प्रत्येक गोष्ट ही जेव्हा सुरू होते, त्याचवेळी तिच्या अंताची वेळ जवळ येत असते. अशीच काहीशी परिस्थिती या समस्येची ही झाली. वेळाने का होईना पण काही लोकांना मुली जन्माला आल्या पाहिजेत असे वाटून त्यांनी काही उपक्रम हाती घेतले. 'जिच्या हाती पाळण्यची दोरी ती जगाते उद्धारी' असं एकिकडे म्हटलं जात असतानाच त्यांचाच उ्दधार करण्यासाठी या जगात पदार्पण करण्याची संमती मिळावी यासाठी 'सेव्ह द बेबी गर्ल' सारख्या योजना सुरू काराव्या लागतात ही मोठी शोकांतिका आहे.

या उपक्रमात प्रत्येक व्यक्तीची छोटीसी भूमिका आहे. आई - वडीलांनी आपल्या मुलीला जन्म द्यावा यासाठी त्या दापत्याचा मुलगी जन्माला आल्यावर सत्कार करण्याची गरज निर्माण व्हावी यासारखे दुर्देव ते काय ? त्यामुळे 'सेव्ह द बेबी गर्ल' या उपक्रमाला सुरूवात तरी झाली ही खूप आनंदाची गोष्ट आहे. मुलींच्या जन्माचे प्रमाण स्त्री आरोग्य, बालविवाहासारखी कुप्रथा आणि समाजाची मानसिकता यात वेळीच सुधारणा व्हायला हव्यात नाहीतर काही काळाने विविध अंगाने समाजाचे स्वास्थ धोक्यात येईल. अर्थात हे टाळण्यासाठी ''जिच्या हाती पाळण्याची दोरी प्रथम तिला उद्धारी'' म्हणणेच योग्य होईल. प्रत्येक व्यक्तीला असं वाटले पाहिजे की, माझी मुलगी हसत या जगात येईल आणि आपल्या चिमुकल्या हातात माझं बोट धरून चालायला शिकेल आणि चालता चालता माझा आधार होईल. त्यामुळे 'लेक वाचवा' असं वरवर न म्हणता प्रत्येकाने असे ठरविले पाहिजे की माझी लेक मी वाचवणार. मग कधी कोणाला सेव्ह द बेबी गर्ल असं दुसऱ्यानं सांगाव लागणार नाही. प्रत्येक मुलगी होणार नाही कदाचित किरण बेदी किंवा कल्पना चावला पण ती नक्की काही तरी होऊन दाखवील. कारण तिलाही आवडतं वटवृक्षाप्रमाणे गगनचुंबी विराट रूप धारण करायला. स्वच्छंदी पक्षाप्रमाणे आकाशात मनसोक्त विहार करायला. तेव्हा सर्वांनी आपली लेक वाचवा असं नव्यानं सांगायला नको नाही का?

कु. सविता वसंत पाटील
B. A. भाग - २

# का बुडालं टायटॅनिक ?

तब्बल ९०० फुट लांब, अकरा मजली इमारतीइतकं उत्तुंग यावर २२ फुट उंचीच्या चार चिमण्या, १,०१,००० किलो वजनाचा सहा भागात बनविण्यात आलेला अजस्त्र सुकाणू. या सुकाणूची उंचीच तीन मजली इमारतीइतकी होती. एकूण ३००० तंत्रज्ञानी सतत तीन वर्ष खपून जगातलं सर्वात मोठे प्रवासी जहाज बांधले होते. त्या जहाजाचं वजनही तसचं अवाढव्य होतं फक्त ४६, ३७८ टन

हे महाकाय जहाज चालविण्यासाठी ५५,००० अश्वशक्तीची इंजिन्स बसविण्यात आली होती. सर्व प्रकारच्या सुखसोयींनी खचाखच भरलेल्या या जहाजावर एकाचवेळी ६,००० लोकांना जेवायला खायला घालता येईल इतकं मोठं स्वयपाक गृहही होतं. त्यातला १५९ चुलींना रोज शेकडो टन कोळसा लागायचा. या जहाजावरील सोळा भाग पाण्यापासून पूर्ण सुरक्षित राहतील इतके भक्कम बांधण्यात आले होते. यामुळे त्या जहाजाच्या निर्मात्यांनी अगदी छातीठोकपणे सांगितले होते की ते जहाज कदापिही बुडणार नाही. हे वर्णन आहे.... त्या काळच्या जगातल्या सर्वात मोठया आणि भरभक्कम प्रवासी जहाजाचं टायटॅनिकचं !

असं हे कधीही न बुडणारं जहाज, आपल्या पहिल्या - वहिल्या प्रवासात १४ एप्रिल १९१२ च्या त्या भयाण रात्री अटलांटिक सागरातल्या भयानक थंडीत बुडालं आणि तेही सोबत ७३५ पहिल्या वर्गाचे ६७४ दुसऱ्या वर्गाचे आणि १८२४ तिसऱ्या वर्गाच्या प्रवाशांसह व त्यांच्यासोबत प्रवाशांच ८०० टन सामान आणि ६००० टन कोळसाही सागरतळाला गेला! हे जहाज बुडवू म्हटलं तरी संपूर्ण बुडण्यास तीन दिवस लागतील अशा अविर्भावात असणाऱ्या त्या जहाजाच्या निर्मात्यांच्या डोळयादेखत ते जहाज फक्त तीन तासात काळाच्या पडद्याआड गेलं आणि विसाव्या शतकाच्या सुरवातीलाच एक मोठया मानवी दुर्घटनेची इतिहासात नोंद झाली. या अपघातातून बोटीवरील २२३५ लोकांपैकी फक्त ७८३ लोकांचेच प्राण वाचू शकले.

एवढ हे अजस्त्र जहाज एका हिमनगामुळे का बुडालं याचा वेध घेण्याचा प्रयत्न जगातील अनेक देशातील शास्त्रज्ञ आजही करीत आहेत. इतकचं काय, तर जेम्स कॅमेरूननं या विषयावर निर्माण केलेल्या 'टायटॅनिक' या चित्रपटानं जगभर उत्पादनाचा उच्चांक मोडला आहे. टायटॅनिक का बुडाले यामागचं शास्त्रीय कारण शोधण्याचे प्रयत्न शास्त्रज्ञांनी आजवर केले. पण या सर्वात वैशिष्टपूर्ण संशोधन १९९१ मध्ये स्टीव्ह ब्लस्को यांच्या नेतृत्वाखाली वैज्ञानिकांच्या एका तुकडीनं केलं.

टायटॅनिक बुडालेल्या जागी समुद्राच्या तळाशी जाऊन त्यांनी जहाजाचे अनेक अवशेष गोळा केले. या अवशेषांपैकी सर्वात महत्त्वाचा बोट ज्या सांगाडयावर बांधली जाते त्याचा एक २५ सेमी व्यासाचा आणि २.५ सेमी जाडीचा एक तुकडाही होता. हिमनगानं आपला तडाखा याच भागाला सर्वप्रथम दिला होता. ७९ वर्षानंतरही या तुकडयात टायटॅनिकच्या दुर्घटनेमागचं रहस्य दडलं होतं. हा तुकडा पाहिल्यावर शास्त्रज्ञांना एक महत्त्वाचा दुवा मिळाला, तो म्हणजे तो तुकडा काचेचं भांड फुटाव तसा फुटला होता. कठीण पोलादाची अशी अवस्था होत नाही. याचमुळे शास्त्रज्ञांनी यावर आणखी प्रयत्न करायचे ठरविले. त्यासाठी त्यांनी त्या भागाचे सिगारेटचे आकाराचे तुकडे केले. त्याच्यासोबत नेहमीच्या वापरातले पोलादाचेही तसेच तुकडे बनविण्यात आले. हे दोन्ही तुकडे एका यंत्रात बसविण्यात आले. या यंत्रात एक मोठा जाडजूड लंबक होता तो जोराने या तुकडयावर आदळेल अशी अवस्था होती. एकाच वेगानं एकच लंबक त्या सिगारेटच्या आकाराच्या त्या तुकडयावर

आदळण्यात आला. त्यावेळी नेहमीच्या वापरातला पोलादाचा तुकडा इंग्रजी व्ही आकारात वाकला, पण तुटला नाही. पण टायटॅनिकच्या अवशेषापासून बनवलेला तुकडा मात्र चक्क दोन तीन ठिकाणी तुटला आणि ते तुकडे भिंतीवर वेगाने जाऊन आदळले. टायटॅनिकवर वापरलेलं पोलाद इतक ठिसूळ का? याचा मागोवा घेताना शास्त्रज्ञांना एक शास्त्रीय सत्य समोर दिसलं. टायटॅनिकसाठी वापरलेल्या पोलादात गंधकाचे प्रमाण अधिक असले की ते ठिसूळ बनते.

या अपघातामुळे आणखी योगायोग जगासमोर आला. या दुर्घटने अगोदर १४ वर्षे म्हणजे १८९८ मध्ये मॉर्गन रॉबर्टसन या लेखकानं टायटन नावाची एक कांदबरी लिहीली होती. त्यात टायटन नावाचं ३००० प्रवाशांना घेऊन जाणार एक जहाज हिमनगावर आपटून फुटलं असं कथानक होत.

योगायोग म्हणावा का? की लेखाद्वारे कोणत्या तरी एका अद्भूत शक्तीनं जगाला दिलेला तो एक इशारा होता....

कु. ऋतुजा सिताराम पाटील
B. Sc. I



# मला समजलेले यादव सर

बुधवार दिनांक २६ जानेवारी २०११ रोजी सकाळी आठ वाजता लोकमत वर्तमानपत्र माझ्या हातात पडले ...ली माझ एका बातमीने वेधून घेतल आणि ती बातमी म्हणजे 'रसायनशास्त्रज्ञ डॉ. जी. डी. यादव उदया ...मध्ये' अशा अनेक बातम्या वर्तमान पत्रात झळकत असतात पण या बातमीने माझे डोळे भरून आले. काही महिन्यापुर्वी यशस्वी यादव यांची मुलाखत सकाळ या वर्तमान पत्रात आली होती' त्यांनीही आपल्या ...सासाठी खूप मेहनत घेतली होती पण त्यांची कौटुंबिक पार्श्वभुमी चांगली होती. तसेच त्यांचे घरचे वातावरण हे शिक्षणास पोषक होते. पण जी. डी. यादव यांची कौटुंबिक पार्श्वभुमी आपल्यासारखीच म्हणजे - ते एका शेतकरी कुटूंबात अर्जुनवाडा या लहानशा खेडयात वाढलेले आहेत. कोल्हापूर जिल्हयाचे सुपूत्र व आतंरराष्ट्रीय दर्जाचे प्रसिद्ध रसायनशास्त्रज्ञ तसेच अभिमत विद्यापीठ मुंबईचे कुलगुरू व रसायनशास्त्र तंत्रज्ञान संस्था मुंबईचे संचालक आहेत. त्याचवेळी माझ्या डोक्यात प्रकाश पडला की, शेतकरी कुंटूबातील व्यक्ती हे सर्व काही करू शकते तर आपण का नाही करू शकत ? आणि सुदैवाने दुसऱ्या दिवशी म्हणजे २७ जानेवारी २०११ रोजी आमच्या दूधसाखर महाविद्यालय, बिद्री मध्ये त्यांचे व्याख्यान आयोजित केले होते.

त्यांची कोंटुबिक पार्श्वभुमी पाहता मला असं वाटतं की " लहरोसे डरकर नौका कभी पार नही होती कोशिश करनेवालों की कभी हार नही होती " २७ जानेवारी हा दिवस माझ्या आयुष्यातील सोनेरी दिवस आहे. तो मी कधीही विसरणार नाही. प्रत्येकं व्यक्तीला प्रश्न पडला असेल की लहान गावातील व एका शेतकरी कुटूंबातील व्यक्ती एवढया पुढे जाऊ शकते. त्यांनी एक स्वतःची ओळख व आदर्श निर्माण केला आहे. मला सांगण्यास आनंद होत आहे की आदर्श व्यक्तींच्या यादीत त्यांच्या नावाची भर झाली आहे. इतके अनर्थ एका अविद्यने केले या मंत्राला त्यांनी कृतीत आणलं आहे. आपण २१ व्या शतकात ज्ञानार्जन करत असून आपल्याला अडचणी येतात पण डॉ. यादव यांच्या शैक्षणिक कालखंडात कितीतरी भयानक अडचणींना त्यांना सामोर जावं लागल होत. त्यावेळी मला समजलं की आपल्या अडचणी कितीतरी क्षुल्लक आहेत. या भष्ट्राचारी व राजकारणी युगात अजुनही चांगली माणसं वावरत आहेत याच मला प्रत्यक्ष उदाहरण पाहायला मिळाल खरंच ! डॉ. यादव यांच्या सारखी भाग्यवान माणसे आम्हाला भेटणे म्हणजे आमचं भाग्यचं आहे.

गुलाबाचं फुल दृष्टीसुख देत, पण त्या गुलाबाच्या फुलाला मात्र काटयांशी संघर्ष ठेवून जन्म घ्यावा लागतो. ही त्या फुलाची सत्वपरीक्षाच असते डॉ. यादव यांच जीवनही यापेक्षाही काही वेगळ नाही. डॉ. यादव यांच प्राथमिक शिक्षण म्हणजे पहिली ते सातवी पर्यंतचे शिक्षण त्यांच्या गावी 'अर्जुनवाडा' या ठिकाणी झालं व आठवी व नववी पर्यंतचे शिक्षणे विवेकानंद विद्यालय - शेळेवाडी, येथे झाल तसेच दहावी - अकरावी शिक्षण प्रायव्हेट हायस्कुल कोल्हापूर या ठिकाणी झाले. त्यावेळचा त्यांच्या जीवनातील किस्सा म्हणजे ' त्यांना इंग्रजीच्या सरांनी (Minute) या शब्दाचा उच्चार करण्यास सांगितला त्यावेळी त्यांनी या शब्दाचा अर्थ मिनीट न करता मायन्युट म्हणजे सुक्ष्म असा केला त्यावेळी त्यांचे सर ओरडले, 'तुम्ही खेडयातील विद्यार्थी म्हणजे गाळ' त्याच क्षणी त्यांच्या भावना दुखावल्या गेल्या आणि त्यांनी मुख्याध्यापकाकडे तक्रार केली. त्याचक्षणी त्यांच्या मुख्याध्यापकांनी त्यांच्या स्वभावातील चुणूक व गुण पाहून त्यांनी त्यांची आय. आय. टी. परीक्षेचा फॉर्म भरला. त्यांनी आपला हा किस्सा सांगितल्यावर मला एक प्रार्थना आठवली. आमच्या शाळेत म्हणून घेतली जात होती, ती म्हणजे,

" विद्या हे धन आहे रे श्रेष्ठ साऱ्या धनाहून,
तिचा साठा जयापाशी तो ज्ञानी मानती जन."

माणसं योगायोगाने, नशिबाने किंवा अपघाताने यशस्वी होत नाहीत. यश हा अपघात नाही किंवा चमत्कारही नाही. मला नेहमी असं वाटत की आपण जे आतापर्यंत करत होतो तेच पुन्हा कराल तर आपल्याला तेच मिळेल जे आतापर्यंत मिळत होत आधी कधीच न मिळवलेल मिळवण्यासाठी आधी कधीच न केलेलं करावं लागेल. आपल्यापेक्षा हलाखीच्या युगात यशस्वी न होण्यासाठी कुठलंही कारण नाही. जगामध्ये असे हजारो लोक आहेत ज्यांना आपल्यापेक्षा जास्त अडचणींना, आपल्यापेक्षा जास्त हलाखीच्या परिस्थितींना तोंड द्यावं लागलं ज्याची कल्पना करण कठीण आहे. तरीही डॉ. यादव सर्व परिस्थितीवर मात करून पुढे निघून गेले.

डॉ. यादव याचं प्रचंड यश पाहून बरेच विद्यार्थी प्रभावित झाले पण डॉ. यादव यांना कशा कशा परिस्थितींना किंवा अडचणींना अपयशांना हाताळत त्या यशापर्यंत पोहचले असतील याचा विचार करणे खूप कठीण आहे.

जगावर राज्य करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या नेपोलियनचे नाव ऐकल्यावर तो एके काळी नोकरीच्या शोधात गल्ली गल्ली, उपाशीपोटी भटकणारा सामान्य तरूण असेल यावर विश्वास बसत नाही.

किती वेळा ही समजूत माणसाला यशापासून दूर ठेवते की जे लोक यशस्वी होत आहेत ते आपल्यापेक्षा जास्त हुशार आहेत. तसं काहीच नाही कोणीच तुमच्यापेक्षा जास्त हुशार नाही, सर्व माणसे सारख्य पध्दतीने जन्माला येतात, सारख्या पध्दतीने जीवनावश्यक गरजा पूर्ण करतात. सारख्याच पध्दतीने मरतात. खरंच आतापर्यंत जगलेल्या आयुष्यात हा विचार माझ्या मनात एकदा ही आला नाही. खेडयातील शिक्षकांकडून जे चांगले अनुभव येतात ते शहरी शिक्षकांकडून येत नाहीत. मी एका खेडयात जन्मलेल्याचा मला आनंद आहे कारण मला निसर्गाच्या सानिध्यात शिकायला मिळतंय तसेच आता शहरी जीवनातील निसर्ग आता लोप पावत आहे. उदाहरणार्थ निसर्गाचा नियम सांगतो की आधी पेरावं लागतं आणि नंतर उगवतं. एखादा माणूस या नियमाच्या उलट करण्याचा प्रयत्न करत असेल तर त्या माणसाला काय मिळेल याचा विचार आपण प्रत्येकाने केला पाहिजे. कुठली का अडचण येईना, त्या अडचणीवर मात करून पुढे जाणं सुरूच ठेवायचं. महत्वाची आणि लक्षात ठेवायची गोष्ट म्हणजे ध्येयावर पोहचेपर्यंत थाबायचं नाही. अशाप्रकारे माणूस ध्येयावर पोहचतो आणि यशस्वी होतो. खरंच डॉ. यादव यांची ही जीवन जगण्याची शैली पाहून मन सुखावून जातं.

माणूस परिस्थितीची निर्मिती करत नाही तर परिस्थिती माणसाची निर्मिती आहे. आपण नेहमी म्हणतो की त्यावेळची परिस्थितीच तशी भयंकर होती त्यामुळे मला अपयश आले परंतू हे साफ चुकीच आहे. आपण जर कुठे जात आहोत हे आपल्याला ठाऊक नसेल तर आपण कुठे पोहचू पोहचू कोणास ठाऊक? डॉ. यादव यांच्या कडून एक गोष्ट शिकायला मिळाली ती म्हणजे ' जे लोक यशस्वी होतात ते एक निश्चित ध्येय समोर ठेवून मेहनत करतात आपलं ध्येयच आपलं जग होऊन जायला पाहिजे.' मला आमच्या दूधसाखर कनिष्ठ महाविद्यालयातील इंग्रजीचे सर श्री. आर. के. पाटील यांनी एका शिल्पकाराचा किस्सा सांगितला. त्या शिल्पकाराला एका मनुष्याने प्रश्न केला हा जो तू दगडाला कोरून इतका छान पुतळा बनवला ते तू कसं केलं, त्याचवेळी शिल्प..ार म्हणाला, 'काहीच नाही पुतळा आधिच तेथे होता मी फक्त वरवरचा नको असलेला भाग काढून टाकला, तो पुतळा दगडात होता' हे खरंच आहे. पण पहिल्यांदा हा पुतळा त्या शिल्पकाराच्या डोक्यात होता. ध्येय निश्चित असल्याशिवाय माणूस यशस्वी होत नाही हे मला प्रकर्षाने जाणवू लागलं. ध्येय निश्चित करा.

तुमच्या ध्येयाला मनात कोरून टाका. ध्येयाने झपाटून जा. यश तुमच्याकडे अक्षरक्षः ओढले जाईल. हे डॉ. यादव यांच्या ध्येयाने प्रत्येकाच्या मनात बिंबवल.

डॉ. यादव सरांच स्पष्ट आणि निश्चित ध्येय होत म्हणून ते अतिशय खडतर रस्त्यावर सुध्दा प्रगती करू शकले त्यांनी हे अत्यंत प्रतिकु ल परिस्थितीत शक्य करून दाखवलं आहे. ध्येय शुन्य माणूस रस्ता कितीही गुळगुळीत असला तरी कुठेही पोहचणार नाही. आपल्या महाविद्यालयात अशी अनेक ध्येयशुन्य विद्यार्थी वावरत आहेत याची मला खरच किव येत आहे. ध्येयावर न पोहोचणे ही शोकांतिका नाही. पोहोचण्यासाठी ध्येयच नसणे ही खरी शोकांतिका आहे. डॉ. यादव सरांच्या बोलण्यातून मला एक महत्वाची बाव लक्षात आली ती म्हणजे ' निश्चित ध्येय आणि तिथंवर पोहोचण्याचा दृढ विश्वास केल्यास विरोध आणि अडथळे गायब होऊन जातात. डॉ. यादव सरांच आयुष्य हे ध्येयपूर्ण आहे. ते त्यांच्या ध्येयासाठी वेडे होऊन गेले होते म्हणून त्यांना मदत करण्यासाठी त्याला ती गोष्ट मिळवून देण्यासाठी अक्षरक्षः निसर्गसृष्टी पुढे सरसावली अस मानल तर काही वावग ठरणार नाही.' आपल्याला जर वाटत असेल की आपण हरणार किंवा पराभूत होणार आहोत तर वास्तविक हरण्याची वाट पाहण्याची गरज नाही कारण आपण हरलो आधीच कारण हरण्याच्या विचाराने माणूस कधीच जिंकलेला नसतो. ज्याला यशस्वी व्हायची इच्छा आहे त्या व्यक्तीने विषारी विचार, व्यसने, विषारी माणसे, विषारी पुस्तके हे आपणहून टाळले पाहिजेत, जस तुम्ही व आपण विषारी सापांना टाळतो.

डॉ. यादव सरांच्या आयुष्यात अनेक संकटे, अपयश आलेत पण त्यांनी ती अपयश पचवलेत. कारण त्यांचा त्यांच्या ध्येयावर विश्वास होता. तसेच यशाची सुरूवात ही फक्त आणि फक्त आत्मविश्वासापासूनच होते. डॉ. यादव सरांच्या सारख्या अनेक यशस्वी लोकांचा वेगळेपणा दिसून आला: तो म्हणजे त्यांची काम करण्याची अमर्याद क्षमता चिकाटी व सातत्य. डॉ. यादव सरांनी दिलेल एक तासांच व्याख्यान आम्हाला सर्व काही देऊन गेल. त्याचं चरित्र हे लिहून देखिल संपणार नाही आणि कागदही अपुरे पडतील. आपण काय करू शकतो हे जगाला सांगत बसण्यापेक्षा करून दाखविलेल अधिक चागलं आहे. मेहनतीला पर्याय नाही. मेहनतीची जागा कोणता ही शब्द घेऊ शकत नाही. अपयशे जितकी जास्त यश तितकं मोठ, चूक न करण्याची हमी फक्त तोच माणूस देऊ शकतो जो काहीच करत नाही. नेहमी आपल्या ध्येयावर निष्ठा हवी कारण - 'अनिश्चय अपयशाची गुरूकिल्ली आहे' यशस्वी होणं फक्त शक्यच नाही तर आजच्या युगात ते कधी नव्हत इतकं सोप आहे. आपण खरच स्वतःला बदलायला हव. अपयशी माणसाला प्रत्येक संधीत अडचण दिसत. यशस्वी माणसाला प्रत्येक अडचणीत संधी दिसते. डॉ. यादव सरांच्या सारख्या यशस्वी लोकांनी यशस्वी होण्यासाठी वेळेला महत्व दिलं आहे. कारण वेळ आहे एकविसाव्या शतकाचं नावं, घडयाळ सतत धावत आहे. आपण नेहमी मिनिटांची काळजी घेतली पाहीजे. तास निश्चित पणे स्वतःची काळजी घेतील. वेळ कोणासाठीच थाबंत नाही. वेळ जाण्याआधी वेळेची किंमत ओळखायला शिकल पाहिजे. वेळ वाया आयुष्य वाया, यशस्वी लोकांना वेळेच्या मूल्यांची तीक्ष्ण जाण असते.

Every New Moment is New Challenge For us " वेळेला सहजपणे कधीच घेऊ नये. जगातील सर्व पैसे देऊन गेलेला एक क्षण परत मिळवला जाऊ शकत नाही. म्हणून मला वाटत की,

From Time to Time, Stop & Ask Yourself, What is My Aim? What am I Really Ttying to achive ?

खरचं डॉ. यादव सरांच्या सारखी व्यक्ती आम्हाला भेटली, त्यांचे विचार आम्हाला ऐकण्यास मिळाले हे त्यांचे उपकार आहेत. हे उपकार मी जन्मभर विसरणार नाही. मी आयुष्यभर त्यांची ऋणी राहीन, शेवटी एकच सांगेन,

'' झालेत बहू होतील बहू परंतू याचं सम हा''

'' मी दूधसाखर महाविद्यालयातील विद्यार्थीनी या नात्याने शपथ घेती की, डॉ. यादव सरांच्या सारखे यशस्वी काम निश्चितपणे करून दाखवीन''

' सुरवंटाचे झाले पाखरू,
सर्वत्र लागले भराऱ्या मारू,

नवे जग नवी आशा,
झेप घेण्याची जबर मनिषा,

याच महाविद्यालयाने लावले वळण
त्यावर चढवू यशाची चढण.... यशाची चढण ''

कु. विद्या वसंत पाटील
बी. एस्सी. भाग - १

# पद्य विभाग

## ' राजे '

' राजे ' तुम्ही पुन्हा जन्माला याल का?
या मराठी साम्राज्याला अर्थ नवा द्याल का?

हे मराठे गेले खुपच खचून मनी
या महाराष्ट्रात त्यांना विचारत नाही कोणी
त्यांच्याच नावाखाली खातात दुसरेच लोणी
त्यांच्या या निरर्थक जगण्याला
नवी दिशा द्याल का?
राज़े तुम्ही पुन्हा जन्माला याल का?

याच राज्यात चाललाय भ्रष्टाचार
भ्रष्टाचारी घेऊन फिरतात कार
गरीब जनता आहे सायकल स्वार
हे सगळं बंद करण्याला बळ तुम्ही द्याल का?
राजे तुम्ही पुन्हा जन्माला याल का?

विश्वासानं स्थापन केलात आपण मराठवाडा
ज्ञान, कला, समृध्दी यांचा हा गाडा
भले - भले इथे करतात राडा
हे सगळं थाबवण्याला बळ तुम्ही द्याल का ?
राजे तुम्ही पुन्हा जन्माला याल का?

दिवसा मागून दिवस सरती
तुमची आम्ही गावी किती किर्ती
तुमच्याविना झाली ही माती विनाअर्थी
गरीब जनतेच्या शोधक नजरेला शितलता
तुम्ही द्याल का?
राजे तुम्ही पुन्हा जन्माला याल का?

कु. चव्हाण स्वाती अशोक
वर्ग - बी. ए. II.

## " राजा शिवछत्रपती "

कधीच ना आटिला तो शिवरूपी झरा,
बदलवूनी टाकीला त्याने आपुला समाज हा सारा!
याच माणसांना त्याने
खरे माणसात आणिले
याच समाजात त्याने
समतेचे बीज पेरीले
वंदन करूया आम्ही त्या महान शिवसागरा!
बदलवूनी टाकिला ...... .
एक एक खेळ त्याने
खेळले बुध्दीचे
सर्वांसमोर दोन हात
केले त्या काफरांचे
मराठा बांधवांसाठी झिजला चंदनासारा
बदलवूनी टाकिला ..... .
करूनीया पाणी त्यांनी
आपुल्या अनमोल रक्ताचे
सुख ना पाहिले कधी त्याचे
ना आपुल्या स्वतःचे
लाविला समाजात आपल्या खरा मर्दानीपणाचा दिवा.
मराठयांसाठीच जगला
मराठयांसाठीच गेला
महाराष्ट्रातील मराठयांसाठी
हिरवाही भगवा केला
कोटी कोटी प्रणाम त्या मर्दमराठयाला,
बदलवूनी टाकिला त्याने आपुला समाज हा सारा !.

अजित बचाटे
बी. एस्सी. III (Chemistry)

## " हिम्मत तू हरू नको "

वेळ अजुन गेली नाही
बेसावध तू राहू नकोस
यश आहे तुझ्या हाती
मागे फिरून पाहू नकोस.

धरला आहेस मार्ग प्रगतीचा
मध्येच आता सोडू नकोस
ऐकावे जनाचे करावे मनाचे
हे आता तू विसरू नकोस.

गाजवायचे असेल शोर्य
तर आळस तू करू नकोस
प्रयत्नांची तू कास धर
फळांची अपेक्षा करू नकोस.

ध्येय तुझे निश्चित ठेव
उगाचं गाडी हाकू नकोस
ध्येयहीन प्रवासामध्ये तू
नशिबावर विश्वास ठेवू नकोस.

झेप घे गगनाशी
मागे वळून पाहू नकोस
आधुनिकतेच्या या युगामध्ये
हिम्मत तू हरू नकोस
हिम्मत तू हरू नकोस.

कु. सुनिता भोसले
बी. ए. III, (मराठी)

## " का ? कुणास ठाऊक "

का ? कुणास ठाऊक आज जरा वेगळचं वाटतय.
नेहमीचाच रस्ता जरा लांब वाटतोय
तो पुर्ण करताना जरा घाम सुटतोय
का ? कुणास ठाऊक आज जरा वेगळचं वाटतय.

ओठावर हसु साठतय अन् मनात दुःख दाटतय
का ? कुणास ठाऊक आज जरा वेगळचं वाटतय.

नेहमीची वर्दळ व नेहमीचीच गजबज
कर्णकर्कश हॉर्न व नेहमीचीच बडबड
सर्व काही कानात साठवाव वाटतय
का ? कुणास ठाऊक आज जरा वेगळचं वाटतय.

जीवघेणी स्पर्धा थोडी वाढली आहे
माझ्यापाशी येवून ती अडली आहे
आज येथचं थांबाव अस वाटतय
का ? कुणास ठाऊक आज जरा वेगळचं वाटतय.

जीवन संपत चाललय, शरीर सुकत चाललय
पण आता जरा जगावसं वाटतय
का ? कुणास ठाऊक आज जरा वेगळचं वाटतय.

स्वप्निल मारूती यादव
बी. एस्सी. भाग - II

## " व्यसनांधता "

अरे, माणसा दारू का पितोस ?
उगा, लायकी का घालवतोस ?
दारूमुळे उद्ध्वस्त जीवनं
जवळ आलय ते मरण
दारून संसार उद्ध्वस्त होई
तुझ्या या जीवघेण्या दारूपाई
उगा, प्राण का रे घालवतोस ?
दारूचे दोन घुटके
देती मरणाचे झटके
दारूची एकच नशा
देती मरणाची दिशा
उगा, प्राण का रे घालवतोस ?
दारूत जिवघेणे विषाणू
दारूला अमृत नको मानू
दारूत जीवन सार बेकार
दारूसाठी बनसी तू लाचार
उगा, प्राण का रे घालवतोस ?

हर्षल बळवंत जितकर
वर्ग - बी. ए., भाग - II,



## " माय बाप "

ऐका ऐका दोस्तांनो माय बापाची र कहानी
बाप नारळ खोबर माय नारळाच पाणी.
माय नेसती लुगड दोन चार ठीगळाच
तिला ठिगाळ पुरणा भल्या मोठया आभाळाचं,
साधी सुधी माझी माय, तिची साधीच राहणी
बाप नारळ खोबर माय नारळाच पाणी.
साधा सुधा बाप माझा त्याच साधच धोतर
कुडता फाटलेला त्याचा बाहेर येतोय कोपर,
त्याच्या बुटाची मी काय द्यावी चांगली निशानी
बाप नारळ खोबर माय नारळाच पाणी.
एकदा माय बापामध्ये पैज अशी ही लागली
सागं पोरा बर सांग कोणाची सावली,
थोडी हसून माय बोलली थोडी लाजून बोलली
थोडी दोघांची सावली थोडा थोडा दोघावाणी
बाप नारळ खोबर माय नारळाच पाणी.
माय म्हणे माझ्या लेका, सुन साधी भोळी आन
गुण आपल्या वाणी तिच रूप गोरपान,
आन थोडीशी ती येडी आण थोडीशी ती पाणी
बाप नारळ खोबर माय नारळाच पाणी.
बाप म्हणे माझ्या लेका सुन आणू नको आता
तिच गोड बोल ऐकून आम्हा घालशील लाथा,
बाप नको नको म्हणे माय करी दयामया
बाप नारळ खोबर माय नारळाच पाणी.
स्वप्न बघतात दोघे लेक माझा मोठा होईल
सुख पायथ्याशी त्याच्या दुधा तुपात राहील,
खूप कमाविल नाव खूप कमाविल वाणी
बाप नारळ खोबर माय नारळाच पाणी.

दिगंबर केरबा पाटील
बी. ए. I

## ' खूप शिकव तू मजला '

खूप शिकव तू आई मजला
अभ्यास करीन मी चांगला
सारे जग हे येईन बघुनी
आनंद होईल तुजला खूप शिकव तू मजला ।।१।।

खूप शिकूया पुढे जाऊया
अभिमानाने जगू या
जगात येऊनी नाव काढूया
आनंद होईल तुजला खूप शिकव तू मजला ।।२।।

शाळेचे माझ्या नाव काढूया
भवितव्य उज्ज्वल करूया
भारत देश हा घडवू चांगला
आनंद होईल तुजला खूप शिकव तू मजला ।।३।।

कु. श्रीकांता केरबा पाटील
बी. एस्सी. II,

## " आई "

फुलापेक्षा सुध्दा कोमल स्पर्श तिचा
जसा बुंध्यातून सुगंध येतो चंदनाचा
चंदनासारखा अंधारात दिप प्रज्वलीत करणारा
हात तिचा
मला यशाच्या शिखरावर
पोहचवणारा आत्मविश्वास तिचा
माझ्याच हृदयात सामावणारी
आकृती तिची
पाहताच क्षणी दुःख विसरून जाणारी
माझीच जी म्हणून मनाला हेरणारी
माझीच अन् माझीच माय माऊली ती

संदिप रघुनाथ चौगले
वर्ग - बी. एस्सी. III (Chemistry)

## " ये आय "

ये आय .... मला जगायचं हाय
हे अनमोल जग
बघायचं हाय,
सरकारने स्त्री भ्रूण
हत्यावर बंदी आणली
तुला ठाऊक नाय ?
ये आय ... मला जगायचं हाय.
वंशाच्या दिव्यासाठी
मुलगा पाहिजे म्हणून
ऐवढा अट्टाहास हा बरा नाय ?
ये आय ... मला जगायचं हाय.
कुणाला माहित आहे की
तुझी निष्पाप मुलगी
उद्या मोठी बाईसाब होणार हाय
ये आय ... मला जगायचं हाय.
वेलीवर डोलणाऱ्या या
कोमल गुलाबाच्या कळीला
एकदा जीवनदान तू
देशील काय ?
ये आय ... मला जगायचं हाय.

कु. सुप्रिया आनंदा कांबळे बी. एस्सी., भाग - II

## " आई "

सदा हसत राहिलीस
मनात ठेऊनी दुःख, मला वाढवलेस
चंदना सारखे झिजून, देऊ उपमा कशाची
तुझ्या पुढे शुन्य आहे, किंमत या जगाची.

तुझ्या उपकाराचे मोल नाही
आभार मानायला शब्द नाहीत
तुझी लिला महान, तुच माझा श्वास कि प्राण
मी हात जोडावे कुणाला ?, तुला वजा करता
देव मानावे कुणाला ?

सुखदेव सदाशिव पाटील
बी. ए. भाग - II

# ' आयुष्य हे असंच असत '

आपण हसता हसता इतरांनाही हसवायचं असतं
आपण नाही हसलो तरी दाखवायच नसतं
मनातल दुःख, राग ओठावर आणायचं नसतं
प्रेम, कौतुक, आपुलकी ओठवर आणायला विसरायचं नसतं
त्यानचं तर जीवन फुलत असतं
आयुष्य हे असंच असतं.
आपल आयुष्य हे पणतीसारखं असावं लागतं
स्वतः भोवती अंधार ठेवून इतरांना उजेडात
ठेवायचं असतं, आयुष्य हे चंदनासारखं असावं लागतं
स्वःत झिजून इतरांना सुगंध द्यायचा असतो
त्यांनच तर जीवनात आनंद मिळत असतो
आयुष्य हे असंच असतं
आयुष्य हे मोरासारखे असावं लागतं
पायाकडं न बघता स्वःतच्या सौदर्यान
इतरांना सुखवायचं असतं
स्वतःच आपल्या पायाकडं न बघून रडायचं नसतं
जरी रडलो तरी इतरांना दाखवायचं नसतं
स्वतः मधल्या कमीपणाची इतरांना ओळख द्यायची नसते
इतरांमधल्या चांगल्या गोष्टींनी
आपल्या कमीपणाची दरी भरायची असते
आयुष्य हे असंच असावं लागतं.
गमावलेल्या गोष्टींना उगाळत बसायचं नसतं
कमावलेल्या गोष्टींना आपलंस करायचं असतं
जे मिळाल त्यात समाधान मानायचं असतं
जे मिळणार आहे त्यासाठी आपलं दार
कायम खुल ठेवायचं असतं
जे मिळवायचं आहे त्यासाठी लाख लाख
प्रयत्न करायचे असतात.
मात्र प्रयत्नात कधी कमी पडायचं नसतं
मिळालेल्या सुखात डुबून जायचं असतं
मात्र बाहेर आल्यावर जमिनीवरचं राहयचं असतं
आयुष्य हे असंच जगायचं असतं
आपण हसता हसता इंतरांनाही हसवायचं असतं.

कु. ज्योती शं. मुगडे
बी. एस्सी. भाग - I, (Computer, Sci )

# " जीवन "

जीवन हे असच असतं
सुख दुःखाचं कोंदण असतं
कधी - कधी ते आळवावरचं पाणी असतं
देवाला घातलेल गाऱ्हाण असतं.
एकानी आग झालं तर
दुसऱ्यांनी पाणी व्हायचं असतं
एकमेकांच्या खांदयावर डोकं ठेवत
भरभरून रडायचं असतं
तर कधी खळखळून हसायचं असतं.
दाहलेल्या भावनांना मनात कोंडायच नसतं
एखादयाच्या रागावर सुध्दा
तेवढचं प्रेम करायचं असतं
